## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

### मुं.मे.रे.कॉ.च्या वतीने मॅस्कॉट (Mascot) आणि जिंगल (Jingle) स्पर्धेचे आयोजन

**मुंबई, ३१ मे २०२३ -** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ.) च्या वतीने मुंबई मेट्रो मार्ग-३ साठी मॅस्कॉट (Mascot)आणि जिंगल (Jingle) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून १ जून ते ३० जून २०२३ या कालावधीत मुं.मे.रे.कॉ.च्या www.mmrcl.com या अधिकृत संकेतस्थळावर स्पर्धक प्रवेशिका दाखल करू शकतील.

मॅस्कॉट (Mascot)आणि जिंगल (Jingle) या दोन्ही स्पर्धांच्या प्रवेशिका मुं.मे.रे.कॉ.च्या अधिकृत संकेतस्थळाद्वारेच (वेबसाइट) स्वीकारल्या जातील. इच्छुक स्पर्धकांना त्यांचे "नाव, संपर्क तपशील आणि नोंदी" संकेतस्थळावर नमूद करता येणार आहे. स्पर्धेसंबंधीत तपशीलवार नियमावली संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दोन्ही स्पर्धेचे निकाल मुं.मे.रे.कॉ. च्या अधिकृत सोशल मीडिया हँडल तसेच संकेतस्थळावर जाहीर केले जातील. सर्व नागरिकांना या स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे तसेच आकर्षक बक्षिसे जिंकण्याचे आवाहन मुं.मे.रे.कॉ. करत आहे.

मुं.मे.रे.कॉ. ही राज्यातील पहिल्या व सर्वात लांब ३३.५ किमी असलेल्या भूमिगत (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) मुंबई मेट्रो-३ मार्गाची अंमलबजावणी करत आहे. या मार्गातील २६ स्थानके भूमिगत तर एक स्थानक जमिनीलगत असणार आहे. उपनगरीय रेल्वेने न जोडलेल्या भागांनाही या मार्गामुळे जोडणी मिळणार असल्याने मुंबई शहराला मेट्रो-३ च्या रुपात प्रवासाचा उत्तम पर्याय उपलब्ध होणार आहे. (समाप्त)

**For further information please contact: -**
**Vaidehi Khadse/Sr.AGM (PR)**
**9028543087**
**vaidehi.more@mmrcl.com**

**Niti Tamse/AM (PR)**
**8369727364**
**niti.tamse@mmrcl.com**